महाराष्ट्र शासन

क्र. सीपीटी १०९७/[९२] प्राशि - ३
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २१ नोव्हेंबर १९९७.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे.

विषय:- सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.

याचिका क्र. ३४३८/९६ चे संदर्भात मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या व क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या शिफारशींच्या अनुषंगाने सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन पुढील शैक्षणिक संस्थेस त्याच्या नांवापुढे दर्शविलेल्या ठिकाणी इ. १ ली ते ४ थी पर्यंत सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षात सुरु असलेल्या वर्गासह [प्रत्येकी एका तुकडीस] इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त खाजगी प्राथमिक शाळेस कायम स्वरूपी विना अनुदान तत्वावर शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| १. | पश्चिम महाराष्ट्र एज्यूकेशन ट्रस्ट, रविवार पेठ, पुणे. | कोंढवा खुर्द ता. हवेली जि. पुणे | |

२. सदर परवानगी शासन पत्र, समक्रमांक, दिनांक ३१.१२.१९९६ मध्ये दर्शविलेल्या शर्ती व अटींवर देण्यात येत आहे. मात्र सदर परवानगी देण्यापूर्वी संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम स्वरूपी विनाअनुदान तत्वावर मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्य काळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून प्रथम लिहून घ्यावे. व सदर हमीपत्र आपल्या

११/१२/९७

कृ. मा. प.

Scanned with CamScanner

कार्यालयात संबंधित नस्तीवर कायमस्वरूपी जतन करुन ठेवावे व त्याच्या छायांकित प्रती शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे, शिक्षणाधिकारी [प्राथ.], जिल्हा परिषद, पुणे यांचेकडे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात व त्याची एक प्रत शासनास माहितीस्तव सादर करावी.

३. तरी, याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी तसेच, शासन पत्र, दि. ३१.१२.१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

[ श. पां. जोशी ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
१. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. शिक्षणाधिकारी [प्राथमिक], जिल्हा परिषद, पुणे.
३. मा. शालेय शिक्षणमंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी.
४. प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे
५. मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी.
६. सचिव [शालेय शिक्षण], यांचे स्वीय सहाय्यक.
७. अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र एज्युकेशन ट्रस्ट, ९९२, रविवार पेठ, पुणे-२.
८. निवड नस्ती, प्राशि -३.

Scanned with CamScanner